# प्रकरण चौथे

# संशोधन पध्दती

# प्रकरण चौथे

## संशोधन कार्यपध्दती


४.१ प्रास्ताविक

४.२ पूर्वतयारी

४.३ संशोधन पध्दती

४.४ नमुना निवड

४.५ संशोधन साधने

४.६ मुख्याध्यापक प्रश्नावली

४.७ शिक्षक प्रश्नावली

४.८ पर्यवेक्षक मुलाखत प्रश्नसूची

४.९ तज्ज्ञ मार्गदर्शकांच्या मुलाखती साठी प्रश्नसूची

४.१० माध्यमिक विद्यालयांना भेटी व निरीक्षणे

४.११ संशोधन कार्यपध्दती

४.१२ समारोप

# प्रकरण चौथे

# संशोधन कार्यपध्दती

## ४.१ प्रास्ताविक

संशोधकाने "माध्यमिक शाळांमध्ये मूल्यशिक्षणाच्या कार्यवाहीचा चिकित्सक अभ्यास" हा विषय संशोधनासाठी निश्चीत केल्यानंतर सोलापूर जिल्हयातील शिक्षण प्रसारक मंडळ, अकलूज ही संस्था संशोधनाचे कार्यक्षेत्र म्हणून निश्चित केले शिक्षण प्रसारक मंडळ,अकलूज ही संस्था सोलापूर जिल्हयात एक अग्रगण्य संस्था आहे. या संस्थेचे संस्थापक कै. सहकार महर्षि शंकरराव मोहीते पाटील की ज्यांनी माळशिरस तालुक्याचे नंदनवन केले. ओसाड माळरानावर सहकाराच्या माध्यमातून दोन साखर कारखाने, दुध उत्पादक संघ, पोल्ट्री फॉर्म, सूत गिरणी उभी करुन त्यातून समाजाचा आर्थिक विकास घडवून आणला आर्थिक विकासा बरोबर सामाजिक विकास घडविणे आवश्यक आहे. हे महर्षि शंकरराव मोहीते पाटील यांना ज्ञात होते. म्हणून त्यांनी २३ जून १९४८ रोजी शिक्षण प्रसारक मंडळ, अकलूज या संस्थेची स्थापना केली. सुरवातीला ११ विद्यार्थी या संस्थेत बोर्डीगमध्ये होते. आज संस्थेचे सुवर्ण महोत्सवी वर्ष साजरे होत असतांना संस्थेची विद्यार्थी संख्या ५०,००० च्या वरती आहे. संस्थेच्या सध्या ७ प्राथमिक शाळा, ३० माध्यमिक विद्यालये, १० व्यवसाय अभ्यासक्रम विद्यालये, ५ वसतिगृहे, ५ महाविद्यालये, त्यामध्ये एक कला वाणिज्य विज्ञान महाविद्यालय, शारीरिक शिक्षण महाविद्यालय, अध्यापक विद्यालय, शिक्षण शास्त्र महाविद्यालय, औषधनिर्माण शास्त्र महाविद्यालय आहेत. संस्थेने माळशिरस तालुक्यात शिक्षणाचे जाळे विणले आहे. त्याच बरोबर एक विद्यालय माढा तालुक्यात तर एक विद्यालय रायगड जिल्हयात आहे. माध्यमिक शाळांमधील सेवकांचा विचार करता एकूण ३२ मुख्याध्यापक , १२ पर्यवेक्षक, तर ३७१ शिक्षक ज्ञानदानाचे कार्य करत आहेत संस्थेची फक्त संख्यात्मक वाढ झाली असे नाही तर संस्थेने गेल्या ५० वर्षात समाजाला डॉक्टर, इंजिनीअर, वकील, प्राध्यापक, शिक्षक, राष्ट्रीय खेळाडू, मंत्री दिले आहेत.

संस्थेची जी ३० माध्यमिक विद्यालये आहेत त्यापैकी अकलूज परिसरात ७ विद्यालये आहेत.तसेच ५ विद्यालये पंढरपूर - पुणे रस्त्यावर आहेत इतर विद्यालये मुख्य रस्त्यापासुन दूर आहेत पण ती मुख्य रस्त्याला उपरस्त्यांनी जोडली आहेत. संस्था स्थापनेचे मुख्य उद्दीष्ट समाजातील प्रत्येक वर्गाला शिक्षण देऊन सुजाण नागरीक बनवणे हे ध्येय होते व आहे. संस्थेची प्रगती व उज्वल यश पाहता संस्थेचा एक सेवक या नात्याने संस्थेतील शाळांचा संशोधनासाठी अभ्यास करणे अगत्याचे वाटले.

## ४.२ पूर्वतयारी

शिक्षण प्रसारक मंडळ अकलूज व त्या संस्थेतील माध्यमिक विद्यालये संशोधन क्षेत्र निश्चित केले. संस्थेच्या माध्यमिक शाळांनमध्ये मूल्यशिक्षणाचे स्वरुप कसे आहे. कार्यवाही करत असतांना कोणकोणते उपक्रम राबविले जातात. उपक्रमाचे स्वरुप कसे आहे. उपक्रम राबवित असतांना शाळांना कोणकोणत्या समस्या जाणवतात हे पाहणे संशोधनाच्या दृष्टीने महत्वाचे वाटते.

मूल्यशिक्षणासाठी माध्यमिक शाळांना शासनाने १० मूल्ये ठरवून दिली आहेत. त्या १० मूल्यांसाठी वेगवेगळे उपक्रम तयार करण्याचे स्वातंत्र्य शाळांना आहे. त्या १० मूल्यांसाटी काही उपक्रम आहेत. उपक्रमामध्ये काही उपक्रम दैनदिन स्वरुपाचे आहेत. तर काही उपक्रम हे विशेषदिनी साजरे करावयाचे आहेत. मूल्यशिक्षणाच्या उपक्रमाअर्तगत काही प्रात्यक्षिके आहेत तर काही वैज्ञानिक प्रयोग व त्या प्रयोगासाठी आवश्यक असणारी साधने निर्मिती हे आहेत.

मूल्यशिक्षणाचा कार्यक्रम सन. १९९६-९७ या शैक्षणिक वर्षापासून सूरु करण्यात आला. अभ्यासक्रमाचे स्वरुप निश्चित असे नाही. पाठ्यक्रम नाही त्यामुळे पाठ्यपुस्तके नाहीत. मूल्यमापनाची साधने फक्त परीक्षा नसून निरीक्षण तंत्र, पडताळा सूची, समाजमिती ही आहेत. कार्यक्रम आखतांना मुख्याध्यापकांना,पर्यवेक्षकांना, सहशिक्षकांना, कोणत्या समस्या जाणवतात हे पाहण्यासाठी संशोधकाने संस्थेच्या ३० माध्यमिक शाळांन पैकी २५ शाळांना समक्ष भेटी दिल्या. तेथील मुख्याध्यापकांना, पर्यवेक्षकांना, सहशिक्षकांना संशोधनाची पार्श्वभूमी सांगितली. त्यासर्वांनी संशोधनासाठी मदत करायची ग्वाही दिली. मूल्यशिक्षणाची कार्यवाही करत असतांना मुख्याध्यापक व शिक्षक हे दोन घटक मुख्य असल्याकारणाने त्याना प्रश्नावली देण्यात आल्या प्रश्नावली देण्याच्या आगोदर त्या जिल्हयातील तज्ज्ञ मार्गदर्शकाकडून प्रमाणित करण्यात आल्या. मूल्यशिक्षणाची कार्यवाही मूल्यशिक्षणाची कार्यवाही माध्यमिक शाळांनमध्ये करत असतांना पर्यवेक्षक हा मुख्य घटक आहे संस्थेत एकूण १२ पर्यवेक्षक असल्याने त्याच्या समक्ष मुलाखती घेण्यात आल्या.

संशोधकाने संशोधनाचा आराखडा निश्चीत केला. संशोधनाचा आराखडा प्रथम भेटीतच मुख्याध्यापक, पर्यवेक्षक, सहशिक्षक, शिक्षक - विस्तार अधिकारी, जिल्हा शिक्षण विस्तार केद्रांचे समन्वयक, शिक्षणशात्र महाविद्यालयाचे प्राचार्य, जेष्ठ प्राध्यापक व तज्ज्ञ यांना सांगण्यात आला. नमुना निवड करण्यासाठी वरील सर्वांची निवड करण्यात आली.

## ४.३ संशोधन पध्दती

शिक्षणशात्र ही सामाजिक शास्त्राची एक शाखा आहे. शिक्षण क्षेत्रात होणारे संशोधन हे सामाजिक संशोधनात मोडते. शैक्षणिक संशोधनाचे प्रमुख दोन प्रकारात वर्गीकरण केले जाते.

१. मूलभूत संशोधन ( Fundamental Research ) व

२. उपयोजित संशोधन ( Applied Research )

### १. मूलभूत संशोधन ( **Fundamental or Basic Research** )

या प्रकारच्या संशोधनात मूलभूत सिध्दांत प्रस्थापित केलेले असतात. तात्विक चर्चेचा भाग अधिक असतो. ज्ञानासाठी ज्ञान ही भूमिका मूख्य असते. Travers ने मूलभूत संशोधनाची व्याख्या पुढील प्रमाणे केली आहे. " Basic Research is designed to add an organised body of scientific knowledge & does not necssarily produce results of immediate practical values "

## २ ) उपयोजित संशोधन ( **Applied Research** )

विशिष्ट अडचण निर्माण झाल्यानंतर तिचे निराकरण करणे हे उपयोजित संशोधनाचे वैशिष्ट होय. हया प्रकारच्या संशोधनात समस्यांचा शोध घेणे, समस्या निर्मितीला प्रतिबंध करण्याचा प्रयत्न केला जातो व त्यावर उपाय योजना सुचविल्या जातात. सामाजिक नियोजन, सामाजिक अधिनियम, सामाजिक स्वास्थ, धर्म, शिक्षण, न्याय, मनोरंजन, हया बाबतीत हे संशोधन होते. प्रस्तुत संशोधन हे उपयोजित संशोधनात मोडते.

शैक्षणिक संशोधनाच्या तीन प्रमुख पध्दती आहेत.

१. ऐतिहासिक पध्दती - या पध्दतीत भूतकाळातील परिस्थीतीचा, समस्याचा विचार केला जातो.
२. वर्णनात्मक पध्दती - या पध्दतीने वर्तमानकाळातील समस्या सोडविल्या जातात.
३. प्रायोगिक पध्दती - भविष्यकाळात एखादया समस्येबाबत काय स्थिती असेल याचा या पध्दतीत समावेश होतो.

वर्णनात्मक संशोधन पध्दतीतील सर्वेक्षण पध्दतीने प्रस्तुत संशोधन केलेले आहे.

प्रस्तुत संशोधनात खालील बाबींवरती प्रामुख्याने लक्ष केंद्रीत केले आहे व त्याचाच सखोल अभ्यास केलेला आहे.

१. माध्यमिक शाळांमध्ये दिल्या जाणा-या मूल्यशिक्षणाचे स्वरुप समजावून घेणे.
२. शासनाने ठरवून दिलेल्या १० मूल्यांपैकी ती किती प्रमाणात साध्य होतात यांचा चिकित्सक अभ्यास करणे.
३. माध्यमिक शाळांमध्ये मूल्यशिक्षणाची कार्यवाही करतांना येणा-या समस्या अभ्यासणे.
४. मूल्यशिक्षणाची कार्यवाही करतांना येणा-या समस्या सोडविण्यासाठी शिफारशी करणे.

वरील बाबींचा अभ्यास सखोल होण्यासाठी मुख्याध्यापक व सहशिक्षक यांना प्रश्नावली दिलेल्या आहेत. तर पर्यवेक्षक , शिक्षण विस्तार अधिकारी, जिल्हा शिक्षण विस्तार केंद्राचे समन्वयक, शिक्षणशास्त्र महाविद्यालयाचे प्राचार्य, जेष्ठ प्राध्यापक, तज्ज्ञ यांच्या मुलाखती घेतलेल्या आहेत. प्रश्नावली व मुलाखती यांना मुर्त स्वरुप येण्यासाठी प्रश्नसूची तयार केली. प्रश्नसूचीचा वापर करुन नमुना निवड करण्यात आली.

## ४.४ नमुना निवड

प्रस्तुत संशोधनासाठी सामग्री गोळा करण्यासाठी संशोधकाने शिक्षण प्रसारक मंडळ, अकलूज या संस्थेच्या माध्यमिक शाळांचा सामग्री गोळा करण्यासाठी विचार केला.

शिक्षण प्रसारक मंडळाच्या एकूण ३० माध्यमिक शाळा आहेत त्यापैकी २५ शाळांची निवड करण्यात आली.

संस्थेतील तुकडयांचे प्रमाण कमी अधिक आहे. त्यामुळे एकूण १२ पर्यवेक्षकापैकी ८ पर्यवेक्षकांची निवड मुलाखतीसाठी करण्यात आली.

एकूण ३७१ माध्यमिक शिक्षकांपैकी १०० शिक्षकांची निवड करण्यात आली.त्यापैकी ७४ शिक्षकांनी प्रश्नावली भरून दिली.

शिक्षण प्रक्रियेत नवीन उपक्रम राबविण्याची जबाबदारी शाळांची आहे त्याहीपेक्षा जास्त शिक्षण विस्तार अधिकारी, शिक्षण विस्तार केंद्राचे समन्वयक यांची आहे. यांचीही प्रतिसादक म्हणून निवड करण्यात आली.

शिक्षणशास्त्र महाविद्यालयातून भावी शिक्षक तयार केले जातात त्यामुळे जिल्हयातील एकूण ५ प्राचार्यांची प्रतिसादक म्हणून निवड केली. त्याच प्रमाणे शिक्षणशास्त्र महाविद्यालयातील ५ जेष्ठ प्राध्यापकांची निवड प्रतिसादक म्हणून करण्यात आली.

मूल्यशिक्षणाची कार्यवाही करत असतांना मुख्याध्यापक व सहशिक्षक यांना प्रश्नावली देऊन कोणत्या समस्या जाणवतात हे पाहिले. प्रश्नावली परिशिष्ठ "अ" व "ब" मध्ये अनुक्रमे दिलेली आहे. पर्यवेक्षकाच्या घेतलेल्या मुलाखतीची प्रश्नसूचीची नोंद परिशिष्ठ "क" मध्ये आहे. शिक्षण विस्तार अधिकारी, शिक्षणविस्तार केंद्राचे समन्वयक, शिक्षणशास्त्र महाविद्यालयांचे प्राचार्य व जेष्ठ प्राध्यापक मूल्यशिक्षणाची जाण असणारे तज्ज्ञ यांच्या मुलाखतीची प्रश्नसूची परिशिष्ठ "ड " मध्ये आहे. मुख्याध्यापक, सहशिक्षक, पर्यवेक्षक व तज्ज्ञ यांची वर्गवारी खालील प्रमाणे आहे .

सारणी क्रमांक ४.०१

प्रतिसादक संख्या

| अ.नं. | प्रतिसादक स्वरुप | प्रतिसादक एकूण संख्या |
|---|---|---|
| १. | मुख्याध्यापक | २५ |
| २. | सहशिक्षक | ७४ |
| ३. | पर्यवेक्षक | ०८ |
| ४. | शिक्षण विस्तार अधिकारी | ०४ |
| ५. | शिक्षण विस्तार केंद्राचे समन्वयक | ०१ |
| ६. | शिक्षणशास्त्र महाविद्यालयाचे प्राचार्य | ०८ |
| ७. | शिक्षणशास्त्र महाविद्यालयातील तज्ज्ञ प्राध्यापक | |
| | एकूण - | १२४ |

## ४.५ संशोधन साधने

संशोधनासाठी सामग्री गोळा करण्यासाठी संशोधनाची वेगवेगळी साधने आहेत. १. निरीक्षण २. मुलाखती ३. प्रश्नावली ४. समाजमिती ५. मानस शास्त्रीय कसोटया इत्यादी प्रस्तुत संशोधन वर्णनात्मक प्रकारचे असल्याने संशोधकाने प्रश्नावली हे सामग्री गोळा करण्याचे मुख्य साधन म्हणून निवडले. त्याच बरोबर संशोधनासाठी पूरक माहिती गोळा करण्यासाठी मुलाखती व निरीक्षण तंत्राचा अवलंब केला आहे. मुख्याध्यापक आणि शिक्षक यांना पाठविलेल्या प्रश्नावलीतील उद्दिष्टांचे वर्गीकरण कोष्टक खालील प्रमाणे आहे.

## ४.६ मुख्याध्यापक प्रश्नावली

सारणी क्रमांक ४.०२
मुख्याध्यापक प्रश्नावली विश्लेषण

| अ.न. | विभाग | उद्दिष्टे |
|---|---|---|
| १. | अ) मुख्याध्यापक वैयक्तिक माहिती | मुख्याध्यापकाची वैयक्तिक माहिती मिळवणे. |
| २. | ब) विद्यालय सर्व साधारण माहिती | विद्यालयाची सर्वसाधारण माहिती मिळवणे. |
| ३. | क) मूल्यशिक्षण नियोजना बाबत प्रश्न | मूल्यशिक्षण नियोजनाचे स्वरुप समजावून घेणे. |
| ४. | ड) मूल्यशिक्षणासाठी आवश्यक असणारी भौतिक सुविधा | मूल्यशिक्षणासाठी आवश्यक असणा-या भौतिक सुविधा किती प्रमाणात आहेत त्या अभ्यासणे. |
| ५. | इ) मूल्यशिक्षण कार्यवाही वर परिणाम करणा-या बाबत प्रश्न घटकावर प्रश्न | मूल्यशिक्षणाची कार्यवाही कशा प्रकारे केली जाते ते अभ्यासणे. |

माध्यमिक शाळांमध्ये मूल्यशिक्षणाचे नियोजन कशा प्रकारे केले जाते मूल्यशिक्षणाची कार्यवाही कोणत्या प्रकारे केली जाते, भौतिक सुविधा योग्य प्रमाणात आहेत का? यासाठी मुख्याध्यापकांना प्रश्नावलीच्या माध्यमातून ३६ प्रश्न विचारण्यात आले त्यापैकी बध्द प्रश्न २९ आहेत तर मुक्त प्रश्न ७ आहेत ३६ प्रश्न एकूण ५ विभागात विभागले आहेत.

प्रत्येक विभागातील बध्द व मुक्त प्रश्नांची संख्या खालील प्रमाणे

विभाग अ) मुख्याध्यापक वैयक्तिक माहिती
एकूण प्रश्न ५ बध्द प्रश्न ५

विभाग ब) विद्यालयाची सर्वसाधारण माहिती
एकूण प्रश्न ३ बध्द प्रश्न ३

विभाग क) मूल्यशिक्षण नियोजनाबाबत प्रश्न

एकूण प्रश्न १२ , बध्द प्रश्न ९ व मुक्त प्रश्न ३

विभाग ड) मूल्यशिक्षणासाठी आवश्यक असणारी भौतिक सुविधा

एकूण प्रश्न -९, बध्द प्रश्न ८ व मुक्त प्रश्न १

विभाग इ) मूल्यशिक्षण कार्यवाही बाबत प्रश्न

एकूण प्रश्न - ७, बध्द प्रश्न ४ व मुक्त प्रश्न ३.

## ४.०७ शिक्षकांसाठी प्रश्नावली

सारणी क्रमांक ४.०३

शिक्षक प्रश्नावली विश्लेषण

| अ.नं. | विभाग | उद्दिष्टे |
|---|---|---|
| १. | अ) शिक्षकांची वैयक्तिक माहिती | शिक्षकांची वैयक्तिक माहिती घेणे |
| २. | ब) मूल्यशिक्षण प्रशिक्षणाबाबत प्रश्न | मूल्यशिक्षण प्रशिक्षणाबाबत समस्या अभ्यासणे |
| ३. | क) मूल्यशिक्षण कार्यवाहीबाबत प्रश्न | मूल्यशिक्षण कार्यवाही करतांना येणा-या समस्या अभ्यासणे |
| ४. | ड) मूल्यशिक्षण व अभ्यासक्रम पाठ्यक्रम यावरील प्रश्न | मूल्यशिक्षण अभ्यासक्रम व पाठ्यक्रम यांचा संबंध अभ्यासणे |

मूल्यशिक्षणाची कार्यवाही माध्यमिक शाळांमध्ये करत असतांना प्रशिक्षणाची अवश्यकता आहे का? कार्यवाही करतांना भौतिक सुविधा पुरेशा आहेत का? अभ्यासक्रम, पाठ्यक्रम यांचा व मूल्यशिक्षणाचा संबंध आहे का? यासाठी शिक्षकांसाठी प्रश्नावली तयार केली. प्रश्नावलीमध्ये एकूण ४१ प्रश्न विचारले गेले ४१ प्रश्नापैकी २४ बध्द प्रश्न होते तर १७ मूक्त प्रश्न होते.

प्रत्येक विभागातील बध्द व मुक्त प्रश्न संख्या खालील प्रमाणे आहे.

विभाग अ) शिक्षकाची वैयक्तिक माहिती

एकूण प्रश्न ६, बध्द प्रश्न ६ आहेत

विभाग ब) मूल्यशिक्षण प्रशिक्षणाबाबत प्रश्न

एकूण प्रश्न ८, बध्द प्रश्न ५ मुक्त प्रश्न ३ आहेत.

विभाग क) मूल्यशिक्षण कार्यवाहीबाबत प्रश्न

एकूण प्रश्न १७, बध्द प्रश्न ९ मूक्त प्रश्न ८ आहेत

विभाग ड) मूल्यशिक्षण व अभ्यासक्रम, पाठ्यक्रम यावरील प्रश्न

एकूण प्रश्न १०,बध्द प्रश्न ४ मूक्त प्रश्न ६ आहेत

मुख्याध्यापक प्रश्नावली व शिक्षक प्रश्नावली मध्ये अनुक्रमे ३६ व ४१ प्रश्न आहेत.

13537
A

## ४.०८ पर्यवेक्षक मुलाखती प्रश्नसूची

संस्थेतील मा.शाळांमध्ये एकूण १२ पर्यवेक्षक कार्य करत आहेत. माध्यमिक शाळांमध्ये मुख्याध्यापकानंतर पर्यवेक्षक हा महत्वाचा घटक आहे. मुख्याध्यापक आणि शिक्षक यांना जोडणारा मुख्य दुवा म्हणजे पर्यवेक्षक, माध्यमिक शाळांमध्ये मूल्यशिक्षणाची गरज काय, मूल्यशिक्षणाचे नियोजन कशा प्रकारे केले जाते, प्रभावीपणे मूल्यशिक्षण देण्यासाठी कोणकोणते मार्ग अवलंबता येतील, मूल्यशिक्षणाचे मूल्यमापन कशाप्रकारे करावे, मूल्यशिक्षणामुळे विद्यार्थ्यांच्या वर्तनात कोणता बदल घडून आला, शालेय अभ्यासक्रमातून मूल्यशिक्षण
प्रभावीपणे कसे देता येईल, ग्रंथालयात कोणकोणते ग्रंथ मूल्यशिक्षणाला उपयुक्त आहेत, वेगवेगळी मूल्ये रुजविण्यासाठी शाळांना स्वातंत्र्य असावे का? इत्यादी महत्वाच्या घटकावर चर्चा करण्यासाठी पर्यवेक्षकांची मुलाखतीसाठी निवड करण्यात आली. मुलाखतीव्दारे वरील समस्यावर चर्चा करण्यात आली.

## ४.०९ तज्ज्ञ मार्गदर्शकांच्या मुलाखतीसाठी प्रश्नसूची

मूल्यशिक्षणाचा कार्यक्रम माध्यमिक शाळांमध्ये शासनाने ठरवल्यानंतर माध्यमिक शाळांना अप्रत्यक्षपणे मार्गदर्शन करणा-या काही संस्था, व्यक्ती असतात. त्यांचा उपयोग योग्य पध्दतीने केल्यास मूल्यशिक्षणाची कार्यवाही निश्चितच प्रभावीपणे होण्यास मदत होईल म्हणून संशोधकाने जिल्हयातील तज्ज्ञ व्यक्तीची निवड मुलाखतीसाठी केली त्यामध्ये शिक्षणशास्त्र महाविद्यालयाचे प्राचार्य, शिक्षणशास्त्र महाविद्यालयाचे जेष्ठ प्राध्यापक, शिक्षण विस्तारअधिकारी, शिक्षणविस्तार केंद्राचे समन्वयक, माध्यमिक शाळांचे पर्यवेक्षक यांना मूल्यशिक्षणाचे माध्यमिक स्तरावर कार्यवाहीचे स्वरुप कशा प्रकारचे असावे, मूल्यशिक्षणासाठी कमीतकमी कोणत्या सुविधा असाव्यात, शिक्षकासाठी प्रशिक्षणाची आवश्यकता आहे काय, प्रशिक्षणाची आवश्यकता असल्यास त्याचे स्वरुप कशा प्रकारचे असावे, मूल्यशिक्षण आणि बी.एड्. अभ्यासक्रम यांचा समन्वय साधून भावी शिक्षकामध्ये जाणीव जागृती करता येणे शक्य आहे का, शासनाने ज्या १०मूल्यांवर लक्ष केंद्रीत करावयास सांगितले आहे त्यापैकी किती मूल्ये संक्रमित होऊ शकतील याबद्दल माहिती मिळवण्यासाठी समक्ष भेटून मुलाखती घेण्यात आल्या.

## ४.१० माध्यमिक विद्यालयांना भेटी व निरीक्षण

संशोधनाचे क्षेत्र हे शिक्षण प्रसारक मंडळ, अकलूज हे आहे . शिक्षण प्रसारक मंडळाच्या शाखा प्रमुख्याने माळशिरस तालुक्यात असल्यामुळे संशोधकाने ३० पैकी २५ माध्यमिक शाळांना प्रत्यक्ष भेटी दिल्या. प्रत्यक्ष निरीक्षण केल्यामुळे प्रश्नावलीतून माहिती जमा करतांना ज्या मर्यादा होत्या त्या पुष्कळ प्रमाणात कमी झाल्या. माध्यमिक शाळांना भेटी देत असतांना मूल्यशिक्षणासाठी आवश्यक असणा-या भौतिक सुविधा, त्यामध्ये ग्रंथालय, प्रयोगशाळा, मैदान, सभागृह यांची पाहणी करण्यात आली त्याचबरोबर शाळांमध्ये जे मूल्यशिक्षणाचे उपक्रम राबवले जातात त्याची प्रत्यक्ष पाहणी करण्यात आली.

शाळांना भेट देत असतांना तेथील मुख्याध्यापक, पर्यवेक्षक, सहशिक्षक यांचेकडून मूल्यशिक्षणाच्या कार्यवाहीचे स्वरुप समजाऊन घेण्यात आले. मूल्यशिक्षणाची कार्यवाही करत असतांना कोणकोणत्या समस्या जाणवतात याबद्दल वरील व्यक्तींबरोबर चर्चा करण्यात आली. प्रश्नावलीमधून मिळालेल्या माहितीचे प्रत्यक्ष निरीक्षणावरुन पडताळणी करण्यात आली.

## ४.११ संशोधन कार्यपध्दती

संशोधनाच्या अभ्यासासाठी संशोधकाने केलेले कार्य खालील प्रमाणे

१. प्रथम संशोधकाने मूल्यशिक्षणाच्या तात्त्विक भागाचा अभ्यास केला. हा अभ्यास करण्यासाठी संशोधकाने वेगवेगळ्या आयोगाने सुचविलेल्या मूल्यशिक्षणासाठीच्या शिफारशी अभ्यासल्या.

२. संदर्भ साहित्याचा अभ्यास केल्यानंतर संशोधनाचा आराखडा तयार करण्यात आला.

३. संशोधनासाठी आवश्यक सामग्री गोळा करण्यासाठी शिक्षण प्रसारक मंडळ, अकलूज या संस्थेची निवड करण्यात आली.

४. प्रस्तुत संशोधन वर्णनात्मक संशोधन असल्यामुळे मुख्याध्यापक, शिक्षक याच्यांसाठी प्रश्नावली तयार करण्यात आली. तसेच तज्ज्ञ व्यक्ती शिक्षण विस्तार अधिकारी, पर्यवेक्षक, शिक्षणशास्त्र महाविद्यालयाचे प्राचार्य, शिक्षणशास्त्र महाविद्यालयाचे जेष्ठ प्राध्यापक यांच्या मुलाखतीसाठी प्रश्नसूची तयार करण्यात आली.

५. प्रश्नावली तयार केल्यानंतर तज्ज्ञ मार्गदर्शकांकडून प्रमाणित करण्यात आली. त्यासाठी एकूण ६ तज्ज्ञ व्यक्तींची निवड करण्यात आली.

६. प्रश्नावली प्रमाणित झाल्यानंतर संस्थेची ३० शाळांपैकी २५ शाळांतील मुख्याध्यापक व शिक्षकांना प्रत्यक्ष भेटून प्रश्नावल्याचे वाटप करण्यात आले. त्यानंतर १५ दिवसांनी त्याच्या कडून प्रश्नावल्या भरुन घेण्यात आल्या.

७. पर्यवेक्षक, शिक्षणविस्तार अधिकारी, शिक्षणविस्तार केंद्राचे समन्वयक, शिक्षण शास्त्र महाविद्यालयांचे प्राचार्य, जेष्ठ प्राध्यापक, तज्ज्ञ मार्गदर्शक याच्या मुलाखती घेण्यात आल्या.

८. पर्चेवीस शाळाना भेटी देऊन मूल्यशिक्षणाची कार्यवाही कशा प्रकारे चालते. त्याचे स्वरुप काय आहे त्याचे निरीक्षण करण्यासाठी प्रत्यक्ष भेटी देण्यात आल्या.

९. प्रश्नावलीतून मिळालेल्या माहितीचे एकत्र संकलन करण्यात आले त्याच्यावर संख्या शास्त्रीय प्रक्रिया करण्यात आली.

१०. संख्याशास्त्रीय प्रक्रिया करुन सामान्य निष्कर्ष काढण्यात आले.

## ४.१२ समारोप

मुख्याध्यापक, शिक्षक यांच्या प्रश्नावलीतून मिळालेल्या माहितीचे तसेच प्राचार्य, समन्वयक , शिक्षण विस्तार अधिकारी, प्रर्यवेक्षक यांच्या माहितीचे वर्गीकरण, विश्लेषण व विशदीकरण पुढील प्रकणात आले आहे.